स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२५–२६/२२९ दि. २९/०८/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : वृक्ष लागवड कार्यक्रमाबाबत...
संदर्भ : १.मा.सहसंचालक(उच्च शिक्षण), पुणे विभाग यांचे पत्र क्र. जा.क्र.ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई२०८८०९०, दि.१९/०८/२०२५ चे पत्र
२. मा.कुलसचिव यांचे कार्यालयामार्फत संदर्भ क्र.१ पत्र आवक क्र.आर/५१५६, दि.२१/०८/२०२५ अग्रेषित
३.मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक.संकीर्ण–२०२५/प्र.क्र.७९/ई–९३२२७४/रासेयो कक्ष, दि.२८ ऑगस्ट,२०२५ चे पत्र

महोदय,

वरिल संदर्भ क्र. १, २ व ३ पत्रानुसार वृक्ष लागवड मोहिमेचे नियोजन करून त्यांची अंमलबजावणी करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये वृक्ष लागवड मोहिमेचे आयोजन करून, रोपलागवडीची माहिती अद्ययावत करावी.

तसेच 'एक पेड माँ के नाम' या योजनांतर्गत वृक्ष लागवड मोहिम उस्फुर्तपणे राबविण्यात यावी. आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे. सदर उपक्रमाचा अहवाल त्वरीत https://forms.gle/v2CMBPekUC9hd6gj8 या गुगल फॉर्मद्वारे सादर करावा आणि संदर्भ क्र.३ मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्यापत्रानुसार www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करणे nssmantralaya@gmail.com या मेलवर पाठवणे अनिवार्य आहे. कळावे, ही विंनती.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२६७९५६५

**क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७९/ई-९३२२७४/रासेयो कक्ष,** **दिनांक: २८ ऑगस्ट,२०२५.**

**प्रति,**
**सर्व कृषि व अकृषि विद्यापीठे/संचालनालये/अभिमत विद्यापीठे,**
**महाराष्ट्र राज्य.**

**विषय:-"हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबत...**

**संदर्भ**: १) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: साववि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दिनांक ११ जून, २०२५
२) महसूल व वन विभागाचे क्र.साववि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दिनांक ११ जून, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
३) महसूल व वन विभागाचे पत्र क्र.साववि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दिनांक ११ ऑगस्ट, २०२५.

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये "हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्यानुसार संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाकरीता एकूण ५ लक्ष वृक्ष लागवड करण्याचे लक्ष्य ठरवून दिलेले आहेत.

**२.** त्यानुषंगाने संदर्भ क्रमांक ३ येथील पत्रान्वये "हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवडीच्या अनुषंगाने दिनांक ०६ ऑगस्ट,२०२५ पर्यंत १,४२,८५,८४५ इतक्या वृक्ष लागवडीची नोंद वन विभागाच्या पोर्टलवर झाली असून त्याची केवळ १२.३३% इतकीच टक्केवारी आहे. असे नमूद केले आहे. राज्यात १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असून त्यास आता केवळ एक महिन्याचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे. त्यानुसार, सदर उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सदर मोहिम अधिक प्रभावीपणे मिशन मोडवर राबविणे अत्यंत गरजेचे आहे.

**३.** उपरोक्तप्रमाणे नमूद वस्तुस्थिती लक्षात घेता, "हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेच्या अनुषंगाने आपल्या विभागाला ठरवून दिलेल्या ५ लक्ष वृक्ष लागवडीचे लक्ष्य व त्याचे गांभिर्य लक्षात घेवून, प्रत्येक कृषि व अकृषि विद्यापीठे, संचालनालये, अभिमत विद्यापीठे या अंतर्गत असलेले महाविद्यालये यांनी (संस्थानिहाय) किमान १५० वृक्षांची लागवड करावी. सदर उपक्रम आपल्या स्तरावर अत्यंत प्रभावीपणे राबविण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/ जिओ टॅगिंग इत्यादि मुलभूत

माहिती वन विभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in तसेच सांख्यिकीय अहवाल, रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/ जिओ टॅगिंग इ. माहिती विभागाच्या ई-मेल nssmantralaya@gmail.com वर अपलोड करण्यात यावी.

आपला,

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव सादर:-**

१. मा.अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.वि.) यांचे स्वीय्य सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: 413
दिनांक 22 AUG 2025
राष्ट्रीय सेवा योजना

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
आवक क्र. आर/ 5156
दिनांक : 21.08.2025
जावक दिनांक 21.08.2025
विभाग :

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,
17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1
Web-www.jdhepune.in E-mail:jdhepune@gmail.com
फोन नं. 020-26127833, 26051632, फॅक्स नं. 020-26127833

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/2025/ई2088090 दि. 19-08-2025

Dir-NSS/NSS

प्रति

1. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
2. कुलसचिव, सर्व अकृषि अभिमत व खाजगी विद्यापीठे/संस्था, पुणे.
3. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
4. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वायत्त कला वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, समाजकार्य, व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा.

**विषय:- 10 कोटी वक्ष लागवड कार्यक्रम.**

संदर्भ:-1. मा. मुख्य वनसंरक्षणक (मंत्रालय), मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक: साववि-2025/प्र.क्र.28/फ-11, दि. 11-06-2025
2. मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-1/2025/ई ऑफीस 1940165, दि. 30-07-2025
3. कार्यालयीन पत्र दि. 11-08-2025
4. मा. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणेयांचे कडील पत्र जा.क्र.अ/साववि/योजना/500/2025-26 दि. 17-07-2025
5. मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि1/2025/ई ऑफीस 1940165, दि. 18-08-2025

मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील दि. 18-08-2025 रोजीच्या पत्रासोबत मा. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचेकडील दि. 17-07-2025 पत्राची पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत दि. 11-06-2025 रोजीच्या मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये पुणे जिल्हयाकरीता 01 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागास 50,000 वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असून, उपरोक्त उद्दिष्ट साध्य करण्याकरीता पुणे विभागासाठी पुढील नोडल अधिकाऱ्याची करण्यात आलेली आहे.

| क्र | नोडल अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती ज्योत्सना गायकवाड | कनिष्ठ प्रशासन अधिकार, (गट-ब) | 9527654238 | jdhepune@gmail.com |

त्याअनुषंगाने वृक्ष लागवड मोहीमेचे नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, रोप लागवडीची माहिती अद्यावत करणे आणि संनियत्रंण करण्यासाठी उपरोक्त नियुक्त नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा तसेच संदर्भ क्र. 03 अन्वये आपल्या विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत कळविलेले आहे.

तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागास देण्यात आलेले उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी आपल्या विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये नियुक्ती करण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांनी **"एक पेड माँ के नाम"** या योजनांअतर्गत उस्फुर्तपणे भाग घेऊन उद्दिष्ट पुर्ण करावे.

**सोबत :** संदर्भिय पत्र.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 20-08-2025
11:24:19

**(डॉ.अशोक उबाळे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रत : 1. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-16.
2. मा. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, सर्व्हे नं. 49/फॉरेस्ट कॉलनी, नरेन हिल सो. समोर, साळुखे विहार, वानवडी, पुणे-22.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**
**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-१/२०२५/ई ऑफीस १९४०१६५ दि. /०८/२०२५

प्रति,
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभाग पुणे.

विषयः- १० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम.

संदर्भः- १.विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.अ./सावि/योजना/५००/२०२५-२६ दि.१७.७.२०२५
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो/मवि-१/२०२५/ई.१९४०१६५ दि.३०.७.२०२५

विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.अ./सावि/योजना/५००/२०२५-२६ दि.१७.७.२०२५ यांच्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त विषयाबाबत दि.११.६.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये पुणे जिल्हयाकरीता १ कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट देण्यात आले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागास ५०,००० वृक्ष लागवडीचे उदिष्टे देण्यात आलेले असून उपरोक्त उदिष्ट साध्य करण्याकरीता आपण नेमणूक केलेल्या नोडल अधिकारी यांची माहिती विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांना पाठविण्यात यावी.

तसेच 'एक पेड माँ के नाम' या योजनांतअतर्गत उत्फुर्तपणे सहभाग घेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागास देण्यात आलेले उदिष्टे पुर्ण करण्याकरीता आपल्या स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. व केलल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

Digitally signed by
PRAKASH DHONDU BACHHAV
Date: 18-08-2025 12:41:54
**(डॉ.प्रकाश बच्छाव)**
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

**प्रतः- माहितीस्तव -** विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग पुणे, सर्व्हे न४९/फॉरेस्ट कॉलनी, नरेन हिल सौ. समोर साळुखे विहार, वानवडी पुणे ४११०२२

# महाराष्ट्र शासन वन विभाग

## विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे, यांचे कार्यालय

**सर्व्हे नं ४९/फॉरेस्ट कॉलनी, नरेन हिल सो.समोर साळुखे विहार, वानवडी पुणे-४११०२२.**

**दुरध्वनी क्र. ०२०-२९८०७५११ E-Mail - dydirsfdpune@gmail.com**


---

विषय:- १० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम

जा.क्र.अ/ सावित/योजना/ 500 / 2025-26

पुणे - 411022 दि. 17.07.2025

प्रति,

१) रेशिम विकास अधिकारी, पुणे
२) उप वनसंरक्षक (प्रा) पुणे
३) उप वनसंरक्षक (प्रा जुन्नर
४) सामाजिक वनीकरण विभाग, पुणे
५) कृषि / फलोत्पादन विभाग पुणे
६) ग्रामविकास विभाग
७) नगर विकास विभाग पुणे
८) शालेय शिक्षण विभाग पुणे
९) सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे
१०) जलसंपदा विभाग पुणे
११) महसलु विभाग पुणे
१२) उद्योग विभाग पुणे
१३) गृह विभाग पुणे
१४) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग पुणे
१५) सहकार व पणन विभाग मध्यवर्ती इमारत पूणे
१६) सार्वजनिक अरोग्य विभाग पुणे
१७) उर्जा विभाग पुणे
१८) आदिवाशी विकास विभाग, पुणे
१९) पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय मत्स वि. पुणे
२०) महिला शिक्षण औषधी द्रव्ये वि.
२१) वैद्यकीय शिक्षण विभाग पुणे
२२) पर्यटन विकास महामंडळ विभाग मध्यवर्ती इमारत, पुणे
२३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
२४) राष्ट्रीय विकास महामार्ग प्राधिकरण पुणे
२५) रेल्वे विभाग पुणे
२६) संरक्षण (डिफेन्स) विभाग खडकी, पुणे

संदर्भ:- 1) शासन निर्णय क्रमांक: सावनि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११ दि.११ जून २०२५
2) या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र अ/ सावित/ योजना/193/25-26 दि. 07/07/2025
3) जिल्हाधिकारी कार्यालय (रोहयो) यांचेकडील पत्रक्र. जा.क्र रोहयो / ४३७ / दिनांक १०/०६/२०२५ च्या इतिवृत्तानुसार.

विषयांकित प्रकरणी राज्यात वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी " हरित महाराष्ट्र " या अभियानांतर्गत वर्ष २०२५ करिता 10 कोटी वृक्ष लागवड मोहिम लोक चळवळ म्हणुन राबविण्याबाबत मा. मुख्य मंत्री महोदयांनी दि. ०४.०६.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्देशित केले आहे.

दि. 11 / 06 /2025 रोजी मा. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व पुणे जिल्हयाकरिता 1 कोटी वृक्ष लागवड करण्याचे सोबत दिलेल्या विहित प्रपत्राप्रमाणे उद्दिष्ट वाटप करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ जून रोजी झालेल्या बैठकीदरम्यान

जिल्हयाकरिता १ कोटी उद्दिष्ट घेण्यात आले व त्याप्रमाणे सर्व यंत्रणांचे उद्दिष्ट वाटप करण्यात आले उद्दिष्टाप्रमाणे सन २०२५ च्या पावसाळयामध्ये लागवड करण्याचे नियोजन संबंधित विभागाने करावे.

उपरोक्त वृक्ष लागवड उद्दिष्टा करिता आपले कार्यालयातर्फे नोडल ऑफिसरची नेमणूक करुन त्याचां संपर्क क्रमांक या कार्यालयास देण्यात यावा जेणेकरुन त्यांचेशी संपर्क साधने सोईचे होईल. तसेच ' एक पेड मॅं के नाम ' या योजनांअतर्गत उस्फुर्तपणे भाग घेऊन उद्दिष्ट पुर्ण करावे.

सोबत- सहपत्र वरिल प्रमाणे

(आशा भोंग)
विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, पुणे

प्रतिलिपी- विभागीय आयुक्त, महसुल विभाग पुणे/ मुख्य वनसंरक्षक (प्रा) पुणे यांना इतिवृत्ताचे प्रतीसह माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना इतिवृत्ताचे प्रतीसह माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- उप वनंसरक्षक, पुणे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- उपजिल्हाधिकारी (रोहयो), पुणे तथा नोडल अधिकारी, पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती/ उपप्रमुख कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प. पुणे यांना इतिवृत्ताचे प्रतीसह माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी- सर्व यंत्रणा प्रमुख/ विभाग प्रमुख यांना इतिवृत्ताचे प्रतिसह माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सन्सेह अग्रेषित

**सन २०२५-२६ मध्ये १० कोटी वृक्ष लागबवड**

| अ.क्र | विभाग | वृक्ष लागवड संख्या |
|---|---|---|
| १ | रेशीम लागवड | 20,00,000 |
| २ | वनविभाग प्रा. पुणे | 20,00,000 |
| ३ | वनविभाग प्रा. जुन्नर | 12,00,000 |
| ४ | वनविभाग सा.व. पुणे | 8,00,000 |
| ५ | कृषि/ फालोत्पादन विभाग | 10,00,000 |
| ६ | ग्रामविकास विभाग | 10,00,000 |
| ७ | नगर विकास विभाग | 8,40,000 |
| ८ | शालेय शिक्षण विभाग | 5,00,000 |
| ९ | सार्वजनिक बांधकाम विभाग | 1,50,000 |
| १० | जलसंपदा विभाग | 50,000 |
| ११ | महसुल विभाग | 50,000 |
| १२ | उद्योग विभाग | 50,000 |
| १३ | गृह विभाग | 50,000 |
| १४ | उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग | 50,000 |
| १५ | सहकार पणन | 20,000 |
| १६ | सार्वजनिक अरोग्य विभाग | 20,000 |
| १७ | उर्जा विभाग | 30,000 |
| १८ | आदिवाशी विकास विभाग | 20,000 |
| १९ | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय मत्स वि. | 500 |
| २० | महिला शिक्षण औषधी द्रव्य वि. | 20,000 |
| २१ | वैद्यकीय शिक्षण | 20,000 |
| २२ | पर्यटन विभाग | 10,000 |
| २३ | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | 1,00000 |
| २४ | राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण | 1,00000 |
| २५ | रेल्वे विभाग | 1,00000 |
| २६ | संरक्षण (डिफेन्स) विभाग | 50,000 |

**(आशा भोंग)**
विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, पुणे

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे
१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१
Web - www.jdhepune.in Email:-jdhepune@gmail.com
दूरध्वनी क्रमांक - ०२०-२६१२७८३३. फॅक्स नंबर- ०२०-२६१२७८३३

क्रमांक - ससं/उशि/पुवि/परिपत्रक/२०२५/ई-२०७०१३५ दिनांक - ११ ऑगस्ट, २०२५

**आदेश -**

**वाचा - या कार्यालयाचे आदेश समक्रमांक दिनांक ११ ऑगस्ट, २०२५.**

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४.०६.२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये उच्च व तंत्राशिक्षण विभागास ५ लाख वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेले आहे. त्यानुसार या विभागास ५०००० वृक्ष लागवड करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार या विभागाच्या अधिपत्याखालील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे तसेच इतर अभिमत विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित महाविद्यालये तसेच संस्था यांना प्रस्तूत प्रकरणी काय कार्यवाही करावयाची आहे त्याच्या सूचना वर वाचा मध्ये नमूद केलेल्या या कार्यालयाच्या वर वाचामध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

या अनुषंगाने मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३० जुलै, २०२५ च्या पत्रान्वये वृक्ष लागवडीचे नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, रोप लागवडीची माहिती अद्ययावत करणे आणि संनियंत्रण करण्यासाठी नोडल अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३० जुलै, २०२५ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना नुसार श्रीमती ज्योत्स्ना गायकवाड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रस्तूत कार्यालय यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे आपणास कळविण्यात येते की आपण प्रस्तूत प्रकरणी मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३० जुलै, २०२५ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन संबंधीतांशी संपर्क साधून प्रस्तूत प्रकरणाचा अहवाल या कार्यालयास तसेच मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वेळोवेळी सादर करावा.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 11-08-2025
14:06:20

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रति,
१. श्रीमती ज्योत्स्ना गायकवाड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रस्तूत कार्यालय
२. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३० जुलै, २०२५ च्या पत्रान्वये सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग,**
**17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-1**
**Web-www.jdhepune.in** **E-mail:jdhepune@gmail.com**
फोन नं. 020-26127833, 26051632, फॅक्स नं. 020-26127833

जा.क्र.ससं/उशि/पुवि/ परिपत्रक/2025/ई2070135 दि. 11-08-2025

प्रति,

1. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
2. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग, पुणे.
3. प्राचार्य/प्राचार्या,
   सर्व अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित
   कला वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे विभाग.**

**विषयः- मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वृक्ष लागवड मोहीम संदर्भातील दि. 04-06-2025रोजीच्या झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत.**

संदर्भः-1. मा. मुख्य वनसंरक्षणक (मंत्रालय), मुंबई यांचेकडील पत्र क्रमांकः सावि-2025/प्र.क्र.28/फ-11, दि. 11-06-2025
2. मा. उच्च शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रं.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-1/2025/ई ऑफीस 1940165, दि. 30-07-2025

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडील, दि. 30-07-2025रोजीच्या पत्रासोबत मा. मुख्य वनसंरक्षणक (मंत्रालय), मुंबई यांचेकडील , दि. 11-06-2025 रोजीच्या पत्रानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. 04-06-2025 रोजी वृक्ष लागवड मोहीमे संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागास 05 लक्ष वृक्ष लागवड करण्याचे उदिष्टे ठरवून देण्यात आले आल्यानुसार विभागीय सहसंचालक, पुणे विभाग, पुणे या विभागास 50,000 वृक्ष लागवडीचे उदिष्टे देण्यात आले आहे.

सदर वृक्ष लागवड मोहीमेबाबत पुढील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. वृक्ष लागवडीसाठी पर्याप्त जागांचा (Land Bank) शोथ घेऊन वृक्ष लागवडीची मोहीम हाती घ्यावी.
2. भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन त्या भागात वाढ होऊ शकणाच्या स्थानिक प्रजातींची प्राध्यान्याने लागवड करावी.
3. वृक्ष लागवडीसाठी सुदृढ व सशक्त रोपांची निवड करावी. खाजगी रोपवाटिकांमधून रोपे खरेदी करताना शक्यतो दीड ते दोन वर्षाची दर्जेदार रोपे खरेदी करुन लागवड करावी.

4. वक्षलागवडीचे जिओ-टगिंग (spatial tagging) करावे आणि AI आधारित मोबाईल अॅप वापर करुन सनियत्रंण यंत्रणा बळकट करावी व योग्य डेटाबेस ठेऊन मोहीम संपूर्णपणे पारदर्शकरित्या राबवावी.
5. पर्यावरणपूरक बांबू वृक्ष कुंपणांचा (Tree Guards) वृक्षसंवर्धनासाठी उपयोग करण्यास प्रात्साहन द्यावे.

वृक्ष लागवड मोहिम मिशन मोडवर राबविण्यात यावी, त्यामध्ये जास्तीत जास्त सामुदायिक सहभाग सुनिश्चीत करावा. यामध्ये स्थानिक नागरिक, ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था (NGOS), शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था आणि इतर भागीदारांचा सक्रीय सहभाग घ्यावा. ही मोहीम केवळ शासकीय उपक्रम न ठेवता जनआंदोलनाच्या स्वरूपात घेण्यात यावी. सदर योजनेमध्ये मा. पतंप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलल्या "एक पेड माँ के नाम" या मोहीमेचा ही सहभाग करुन घ्यावा.

वृक्ष लागवड मोहीमेचे नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, रोपलागवडीची माहिती अद्यावत करणे आणि संनियत्रंण करण्यासाठी पुणे विभागासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली असुन, सदर तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नोडल अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | मोबाईल क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| 01 | श्रीमती ज्योत्सना गायकवाड | कनिष्ठ प्रशासन अधिकार, (गट-ब) | 9527654238 | jdhepune@gmail.com |

त्याअनुषंगाने वृक्ष लागवड मोहीमेचे नियोजन करणे, अंमलबजावणी करणे, रोप लागवडीची माहिती अद्यावत करणे आणि संनियत्रंण करण्यासाठी उपरोक्त नियुक्त नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा तसेच आपल्या विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी.

**सोबत** : संदर्भिय पत्र.

Digitally signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 11-08-2025
14:07:04

**(डॉ.अशोक उबाळे)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-1.

**प्रत :** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे-16.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२,ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-४११०१६**
**Web : www.dhepune.gov.in** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२२११९

क्र.उशिसं/वृक्ष लागवड मो./मवि-१/२०२५/ई ऑफीस १९४०१६५ दि. /०७/२०२५

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य

विषयः- मां. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वृक्ष लागवड मोहीमसंदर्भातील दि.४.६.२०२५ रोजीच्या झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याबाबत.

संदर्भः- शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.११/ई.९४६२००/मशि-१ दि.६.७.२०२५

महसूल व वन विभागाचे पत्र क्र.बैठक -२०२५/प्र.क्र.२८/फ-११ दि.११.६.२०२५ च्या पत्राची प्रत सोबत आहे. कृपया अवलोकन करावे.

उपरोक्त विषयाबाबत मा.मुख्यंमत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.४.६.२०२५ रोजी वृक्ष लागवड संदर्भातील बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागास ५ लक्ष वृक्ष लागवड करण्याचे उदिष्ठे ठरवून देण्यात आले आहे. त्यानुसार विभागीय सहसंचालक, कार्यालय यांना प्रत्येकी ५०,००० वृक्ष लागवडीचे उदिष्ठे देण्यात येत असून संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिनस्त महाविद्यालये/ कार्यालयांना त्या प्रमाणात उदिष्ट ठरवून द्यावे व त्याचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

सदर वृक्ष लागवड मोहीमेबाबत पुढील सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. वृक्ष लागवडीसाठी पर्याप्त जागांचा (Land Bank) शोध घेऊन वृक्ष लागवडीची मोहीम हाती घ्यावी.
२. भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन त्या भागात वाढ होऊ शकणाऱ्या स्थानिक प्रजातींची प्राध्यान्याने लागवड करावी.
३. वृक्ष लागवडीसाठी सुदढ व सशक्त रोपांची निवड करावी. खाजगी रोपवाटिकांमधून रोपे खरेदी करताना शक्यतो दीड ते दोन वर्षाची दर्जेदार रोपे खरेदी करुन लागवड करावी.
४. वक्षलागवडीचे जिओ -टॅगिंग (sptial tagging) करावे आणि AI आधारित मोबाईल ॲप वापर करु संनियत्रंण यंत्रणा बळकट करावी व योग्य डेटाबेस ठेऊन मोहीम संपूर्णपणे पारदर्शकरित्या राबवावी.
५. पर्यावरणपूरक बांबू वृक्ष कुंपणांचा (Tree Guards) वृक्षसंवर्धनासाठी उपयोग करण्यास प्रोत्साहन द्यावे .

वृक्ष लागवड मोहिम मिशन मोडवर राबविण्यात यावी, त्यामध्ये जास्तीत जास्त सामुदायिक सहभाग सुनिश्चीत करावा. यामध्ये स्थानिक नागरिक, ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था (NGOs), शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था आणि इतर भागीदारांचा सक्रीय सहभाग घ्यावा. ही मोहीम केवळ शासकीय उपक्रम न ठेवता जनआंदोलनाच्या स्वरूपात घेण्यात यावी. सदर योजनेमध्ये मा. पतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलल्या "एक पेड माँ के नाम" या मोहीमेचा ही सहभाग करुन घ्यावा.

वृक्ष लागवड मोहीमेचे नियोजन करणे अंमलबजावणी करणे, रोपलागवडीची माहिती अद्यावत करणे आणि संनियत्रंण करण्यासाठी आपल्या स्तरावरुन नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करुन संचालनालयास तात्काळ अवगत करण्यात यावे. वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील आपला उक्त अहवाल तसेच महाविद्यालये/विद्यापीठाकडून उपरोकत अहवाल प्राप्त करुन संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ईमेल आयडीवर पाठविण्यात यावा.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 30-07-2025 18:56:18

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग, दालन क्र. ४६० (विस्तार), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दूरध्वनी क्र. २२७९४३२४ ०२२ Email ID : deskf११.rev-mh@gov.in

---

**क्रमांकः- सावि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११** **दिनांकः- ११ जून, २०२५**

प्रति,

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग.
२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
३) महानगर आयुक्त, एमएमआरडीए, मुंबई.
४) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), म्हाडा.
५) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
६) सर्व विभागीय आयुक्त, महसूल विभाग.
७) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
८) सर्व आयुक्त, महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
९) महानगर आयुक्त, पीएमआरडीए, पुणे.
१०) आयुक्त, कृषी आयुक्तालय, पुणे/ संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर/ संचालक, उच्च शिक्षण संचालनालय.
११) महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे / प्रधान मुख्य अभियंता, मध्य रेल्वे.
१२) प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय, मुंबई/ प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मुंबई/ प्रादेशिक अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर.
१३) सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव/सामाजिक वनीकरण).
१४) आयुक्त, मनरेगा, नागपूर.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) उप वनसंरक्षक/ विभागीय वनअधिकारी (प्रादेशिक/ वन्यजीव/सामाजिक वनीकरण).
१८) मुख्य अधिकारी, नगरपरिषद.

**विषयः- मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील दि.०४ जून, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

**महोदय,**

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील बुधवार, दि.०४.०६.२०२५ रोजी दुपारी १:३० वाजता मंत्रीमंडळ सभागृह, सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.

२. सदर बैठकीचे इतिवृत्त आपणांस पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठवण्यात येत आहे.

**आपला,**

**(डॉ.रविकिरण गोवेकर)**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**सोबत-वरीलप्रमाणे.**

प्रत-

१. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर.
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ, नागपूर
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे.
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (महाकॅम्पा).
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास बोर्ड, नागपूर
१३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
१४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.

पत्र क्र.सावि-२०२५/प्र.क्र.२८/फ-११, दि.११.०६.२०२५ रोजीचे सहपत्र.

## मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भातील दि.०४.०६.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

अपर मुख्य संचिव (वने) यांनी मा.मुख्यमंत्री महोदय, मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदय, मा.मंत्री (वने) महोदय व मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदय यांचे तसेच विविध विभागांच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करुन प्रस्तावित वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भात वन विभागाचे सादरीकरण केले. त्यामध्ये जागतिक पातळीवरील वनक्षेत्राची आकडेवारी नमूद करुन भारतातील वनक्षेत्राचे प्रमाण अन्य देशांच्या तुलनेत खूपच कमी असल्याचे अधोरेखित केले. राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार वन आणि वृक्षाच्छादित क्षेत्र भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्क्यांपर्यंत साध्य करावयाचे झाल्यास भविष्यात राज्याकरीता किमान २४० कोटी वृक्ष लागवड करणे आवश्यक असल्याचे सांगितले. वन विभागामार्फत यापूर्वी राबविण्यात आलेल्या ५० कोटी वृक्ष लागवड मोहीमेची माहिती देऊन या मोहीमेची फलश्रुती म्हणून राज्याच्या वन आणि वृक्षाच्छादनात सर्वच क्षेत्रात वाढ झाली असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यानंतर वृक्ष लागवड मोहीमेच्या अनुषंगाने विविध विभाग निहाय वृक्ष लागवडीच्या तयारीबाबत सादरीकरण केले. सादरीकरणानंतर मा.मुख्यमंत्री महोदयांनी वृक्ष लागवड मोहीमेसंदर्भात मार्गदर्शन करुन खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत:-

| अ. क्र. | चर्चेचा विषय/मुद्दे | मा.मुख्यमंत्री यांचे निर्देश/ घेतलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा | अंमलबजावणी चा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सन २०२५ च्या पावसाळ्याकरीता वृक्ष लागवड मोहीमेचे उद्दिष्ट. | सन २०२५ च्या पावसाळयाकरिता १० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम राबवावी. वन विभागाने इतर विभागांशी विचारविनिमय करुन तयार केलेल्या यावर्षीच्या उद्दिष्टांनुसार संबंधित सर्व विभागांनी कार्यवाही करावी. पुढील ३ वर्षांमध्ये अधिक व्यापक प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात यावी व आवश्यक पूर्वतयारी करावी. | सर्व विभाग, वन विभाग (नोडल विभाग), वृक्ष लागवडीचे विभागनिहाय लक्ष्य (परिशिष्ट-अ). | तात्काळ |
| २. | वृक्ष लागवडीसाठी पुरेशा प्रमाणात जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणांचा (Land Bank) शोध घेणे (महसूल विभाग, एमआयडीसी, साखर कारखाने, सुत गिरण्या इत्यादी). | सर्व विभागांनी आपल्या विभागांतर्गत वृक्ष लागवडीसाठी पर्याप्त जागांचा (Land Bank) शोध घेऊन वृक्ष लागवडीची मोहीम हाती घ्यावी. | वृक्ष लागवडीकरीता जागा उपलब्ध असलेले सर्व विभाग. | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | **रोपांची उपलब्धतता तसेच त्या त्या भागांमधील लागवडक्षम स्थानिक प्रजातींची निवड करुन रोपांची निर्मिती करणे.**<br>➢ मा.मंत्री (वने) महोदयांनी भौगोलिकदृष्ट्या लागवडीस योग्य असलेल्या स्थानिक प्रजाती विशेषत: कोकणातील सुरंगी सुगंधी फुलाचे झाड, बहाडोली जांभूळ, रायवळ आंबा इ. लागवड प्राधान्याने करण्याबाबत सूचित केले.<br>➢ सध्या वन विभागाकडे ९ महिने किंवा अधिक कालावधीची सुमारे १.८ कोटी रोपे आहेत.<br>➢ महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय साववि-२०१६/प्र.क्र.८० (भाग-२)/फ-११, दिनांक २५ जुलै २०१८ अन्वये प्रत्येक विभागाने त्यांच्या मंजूर बजेटमधून ०.५% निधी वृक्षारोपणासाठी खर्च करण्याची तरतूद आहे. | वेळ कमी असल्याने यंदाच्या मोहिमेसाठी इतर विभागांनी आपापल्या पातळीवर रोपांची खरेदी करावी. रोपांची खरेदी व देखभालीसाठी लागणारा निधीची उपलब्धता दि.२५ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार करावी. पुढील मोहिमांसाठी वन विभाग हे अन्य विभागांना आवश्यकतेनुसार रोपे उपलब्ध करून देईल. वृक्षारोपण प्रामुख्याने त्या त्या भागांमधील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन त्या भागात वाढ होऊ शकणाऱ्या स्थानिक प्रजातींची प्राधान्याने लागवड करावी. | सर्व विभाग | तात्काळ |
| ४. | **रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करणेबाबत.**<br>➢ मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदयांनी रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करतेवेळी भविष्यात होणारी वाढ व विस्तार विचारात घेऊन करणे आवश्यक असल्याचे, तसेच रेन ट्री सारखे परदेशी वृक्ष न लावण्याबाबत सूचित केले. | सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अखत्यारित येणाऱ्या राज्य मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग आणि ग्रामीण मार्ग यांच्या दुतर्फा वृक्ष लागवडीची संपूर्ण जबाबदारी वन विभागाकडे सुपूर्द करण्याची कार्यवाही करावी. संबंधीत यंत्रणांनी यासाठी लागणारा निधी देखील वन विभागास उपलब्ध करून द्यावा. राष्ट्रीय महामार्ग | सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, वन विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI). | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्राधिकरणाने (NHAI) राष्ट्रीय महामार्गांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्याबाबत केलेल्या तरतुदींची तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच भविष्यातील रस्त्यांचे रुंदीकरण व मजबूतीकरण विचारात घेऊन वृक्ष लागवड करावी. | | |
| ५. | भौगोलिकदृष्टया कमी वन व वृक्षाच्छादन असलेल्या मराठवाड्यातील लातूर, बीड इ. जिल्ह्यांमध्ये सर्व विभागांनी विशेष मोहीम राबवून वृक्ष लागवड करण्याबाबत. | वन विभाग तसेच जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भौगोलिकदृष्टया कमी वन व वृक्षाच्छादन (१० टक्क्यांपेक्षा कमी) असलेल्या जिल्ह्यांमध्ये वृक्ष लागवडीची विशेष मोहीम राबवावी. | वन विभाग, महसूल विभाग, ग्रामविकास विभाग व संबंधीत जिल्ह्यातील सर्व विभाग. | तात्काळ |
| ६. | पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या जागेवर (Compensatory Afforestation Land) वृक्ष लागवड करुन वृक्षाच्छादनात वाढ करणे. | बऱ्याच मोठ्या प्रमाणात पर्यायी वनीकरणाची जागा उपलब्ध असून अशा जागांवर विशेष मोहीम राबवून कॅम्पा निधीमधून वृक्ष लागवड करण्यात यावी. | वन विभाग | तात्काळ |
| ७. | कार्बन उत्सर्जन प्रक्रियेत जास्त वाटा असलेल्या प्रत्येक विभागाने कार्बन फूटप्रिंट तयार करुन कार्बन न्यूट्रलायझेशनसाठी प्रयत्न करणे. | उद्योग विभागांतर्गत एमआयडीसी मार्फत तसेच इतर संबंधीत विभागांनी त्यांची कार्बन फूटप्रिंट तयार करुन कार्बन न्यूट्रलायझेशनसाठी वृक्ष लागवडीची विशेष मोहीम राबवावी. | उद्योग विभाग, ऊर्जा विभाग, परिवहन विभाग व इतर संबंधीत विभाग. | तात्काळ |
| ८. | लागवडीकरिता रोपांची निवड करणे. | वृक्ष लागवडीसाठी सुदृढ व सशक्त रोपांची निवड करावी. खाजगी रोपवाटिकांमधून रोपे खरेदी करताना शक्यतो दीड ते दोन वर्षांची दर्जेदार रोपे खरेदी करुन लागवड करावी. | सर्व विभाग | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | **वृक्ष लागवडीची मोहीमेत पारदर्शकता आणणे.** | वृक्षलागवडीचे जिओ-टॅगिंग (spatial tagging) करावे आणि AI आधारित मोबाईल ॲप वापर करुन संनियत्रंण यंत्रणा बळकट करावी व योग्य डेटाबेस ठेऊन मोहीम संपूर्णपणे पारदर्शकरित्या राबवावी. | सर्व विभाग | तात्काळ |
| १०. | **बांबू अभियानाला प्राधान्य देणे.** | बांबू लागवड पर्यावरणीय व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे असून, याची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी सर्व विभागांनी आणि जिल्हा यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेऊन राज्यात मिशन मोडवर बांबू लागवड करावी. | सर्व विभाग, महामंडळे, प्राधिकरणे व जिल्हा यंत्रणा. | तात्काळ |
| ११. | **बांबू वृक्ष कुंपणांचा (Tree Guards) वापर करणे.** | महाराष्ट्र बांबू विकास महामंडळाकडून तयार करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक बांबू वृक्ष कुंपणांचा (Tree Guards) वृक्षसंवर्धनासाठी उपयोग करण्यास प्रोत्साहन द्यावे (विशेषत: महापालिकांच्या कार्यक्षेत्रात). | सर्व विभाग | तात्काळ |
| १२. | **प्रामुख्याने गडचिरोली सारख्या जिल्ह्यामध्ये मायनिंगखाली जाणारे वनक्षेत्र विचारात घेऊन उच्च क्षमतेच्या नवीन रोपवाटिकांची निर्मिती करणे.** | गुणवत्तापूर्ण रोपांची निर्मिती करण्यासाठी अत्याधुनिक रोपवाटिकांची निर्मिती करावी. तसेच खाजगी क्षेत्रातील रोपवाटिकांमध्ये देखील दर्जेदार रोपांची निर्मिती करण्यावर भर द्यावा. गडचिरोली जिल्ह्यात राजमुंद्रीच्या धर्तीवर नवीन रोपवाटिकांची निर्मिती खाजगी यंत्रणा/मायनिंग कंपनी यांच्या मदतीने करुन पुढील काळात अवनत झालेल्या उपलब्ध क्षेत्रावर १ | वन विभाग | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट गाठावे. | | |
| १३. | **वृक्ष लागवड मोहीमेसाठी जन सहभाग घेणे.** | वृक्षलागवड मोहीम मिशन मोडवर राबविण्यात यावी, त्यामध्ये जास्तीत जास्त सामुदायिक सहभाग सुनिश्चित करावा. यामध्ये स्थानिक नागरिक, ग्रामस्थ, स्वयंसेवी संस्था (NGOs), शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था आणि इतर भागीदारांचा सक्रीय सहभाग घ्यावा. ही मोहीम केवळ शासकीय उपक्रम न ठेवता जनआंदोलनाच्या स्वरूपात घेण्यात यावी. मोहीमेकरिता CSR निधी प्राप्त करावा.<br>मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या "एक पेड माँ के नाम" या मोहीमेमध्ये व्यापक सहभाग घ्यावा. | सर्व विभाग | तात्काळ |
| १४. | **कॅम्पा अंतर्गत उपलब्ध असलेला निधीचा वृक्ष लागवडीकरिता वापर करण्याबाबत.** | कॅम्पा कायद्यातील प्रावधाने तसेच केंद्र सरकारच्या कॅम्पाविषयक मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहून कॅम्पा निधीचा सक्रियरीत्या वृक्ष लागवडीसाठी वापर करावा. | वन विभाग | तात्काळ |
| १५. | **अभिसरण योजनेच्या अंमलबजावणीबाबत.**<br>➢ मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी अभिसरणांतर्गत केलेल्या कामांबाबत समाधान व्यक्त केले. तसेच सदर योजनेच्या माध्यमातून वृक्ष लागवडीसाठी कुशल निधी कमी पडत असल्यास कॅम्पा निधीचा वापर करण्याबाबतची तपासणी करण्याचे सुचवले. | वृक्ष लागवडीसाठी ग्रामसभेचा ठराव, छाननी समितीची मंजुरी व वर्ककोड देण्याची कार्यवाही संबंधीत जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त यंत्रणेने तातडीने करावी. सचिव, रोहयो यांनी सुचविल्यानुसार पुढील कार्यवाही करावी. अभिसरण योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता योजनेच्या शासन निर्णयात काही | रोहयो विभाग आणि सर्व जिल्हाधिकारी | तात्काळ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ➢ प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांनी अभिसरण योजनेची एक वर्षाच्या अंमलबजावणीनंतर निदर्शनास आलेल्या समस्या व अडचणींचा उल्लेख करुन अभिसरण योजनेमध्ये काही बदल आवश्यक असल्याचे नमूद केले.<br>➢ सचिव, रोहयो यांनी अभिसरण योजनेच्या समस्यांबाबत खालील प्रमाणे भाष्य केले:-<br>१) मागील वर्षी सन २०२४-२५ करिता १६ कोटी मनुष्यदिनाची निर्मिती झाली होती.<br>२) त्यामुळे अभिसरणांतर्गत वृक्ष लागवड व रोपवाटिकांसाठी आवश्यक असलेले मजुर उपलब्ध होऊ शकतील.<br>३) ज्या भागांमध्ये मजूर वन विभागाच्या कामास जाण्यास अनुत्सुक असल्यास अशा ठिकाणी ग्राम रोजगार सेवकांच्या मार्फत मजुरांचे एकत्रिकरण (Mobilise) करता येईल.<br>४) ग्राम रोजगार सेवक नसलेल्या ठिकाणी मजुरांची उपस्थिती नोंदवण्यासाठी लॉगिन क्रेडेंशियल वन विभागास उपलब्ध करुन देता येतील.<br>५) कुशल कामांचा प्रलंबित निधी प्राधान्याने वितरीत करण्याबाबत कार्यवाही करण्याचे तसेच ही योजना | सुधारणा आवश्यक असल्यास रोहयो विभागाशी विचारविमर्श करुन तसे वन विभाग प्रस्तावित करेल. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पूर्णपणे कार्यान्वित होण्याकरीता योग्य समन्वय आणि कामांचे नियोजन जिल्हास्तरावर वेळेत करणे आवश्यक आहे. | | | |
| १६. | CFR (Community Forest Resource) **क्षेत्रावर वृक्ष लागवड करणे.** | CFR क्षेत्राकरिता प्राधान्याने CFR व्यवस्थापन आराखडे तयार करावे व ते वन विभागाच्या कार्य आयोजनामध्ये समावेश करावे. त्यानंतर कार्य आयोजनातील नियोजनानुसार CFR क्षेत्रात वृक्ष लागवड करावी. | आदिवासी विभाग व वन विभाग | तात्काळ |
| १७. | **सदर मोहीमेसाठी नोडल अधिकारी नियुक्ती.** | सदर मोहीमेसाठी नोडल अधिकारी म्हणून अपर मुख्य सचिव (वने) राहतील. | वन विभाग | तात्काळ |
| १८. | **योजनेचे संनियंत्रण.** | मोहीमेचे नियोजन, अंमलबजावणी करणे, रोपलागवडीची माहिती अद्ययावत करणे आणि संनियंत्रण करण्यासाठी सर्व विभागांनी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करुन वन विभागास तात्काळ अवगत करावे. | सर्व विभाग | तात्काळ |

बैठकीच्या अंती सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

*********

(परिशिष्ट-अ)

## वृक्ष लागवडीचे विभागनिहाय लक्ष्य

| विभाग | लक्ष्य | विभाग | लक्ष्य |
|---|---|---|---|
| रेशीम विभाग (७५०० acre x ५५००) | ४ कोटी | महसुल विभाग | ५ लक्ष |
| वन (एफडीसीएम, बांबू बोर्डसह) (२०००० Ha.) | २ कोटी | उद्योग विभाग | ५ लक्ष |
| कृषी / फलोत्पादन (५०००० Ha. x २००) | १ कोटी | गृह विभाग | ५ लक्ष |
| ग्रामीण विकास विभाग | १ कोटी | उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग | ५ लक्ष |
| नगरविकास विभाग | १ कोटी | जलसंधारण विभाग | ५ लक्ष |
| "एक पेड माँ के नाम- २.०" | ५० लक्ष | सहकार, विपणन आणि वस्त्रोद्योग विभाग | ४ लक्ष |
| महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | २० लक्ष | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३ लक्ष |
| राष्ट्रीय महामार्ग | २० लक्ष | ऊर्जा विभाग | ३ लक्ष |
| शालेय शिक्षण विभाग | २० लक्ष | आदिवासी विकास विभाग | ३ लक्ष |
| बांधकाम विभाग | १५ लक्ष | पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय विभाग | २ लक्ष |
| रेल्वे विभाग | २० लक्ष | महिला आणि बाल कल्याण विभाग | २ लक्ष |
| जलसंपदा विभाग | ५ लक्ष | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | २ लक्ष |
| डिफेन्स विभाग | ५ लक्ष | पर्यटन विभाग | १ लक्ष |